## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**द्वितीय अपील क्रमांक :- ४२०६/२०१७/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

१ श्री. महेमुद शाह हाजी गफुर शाह, : अपिलार्थी
रा.४५, निहाल नगर, गट नं.१,
मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गॅरेज इन्चार्ज,
मालेगांव महानगरपालिका, मालेगांव,
ता.मालेगांव, जि.नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक आयुक्त् (प्रशासन),
मालेगांव महानगरपालिका, मालेगांव,
ता.मालेगांव, जि.नाशिक.

**विवेचन**

उपरोक्त अपिलासंदर्भात आयोगाने दिनांक २३/०४/२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २०/०६/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी."

सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक, श्री. एकबाल अहमद जान मोहमद यांनी आयोगाकडे

दिनांक २७/०६/२०१९ रोजी टपालाद्वारे लेखी खुलासा सादर करुन असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांचा दिनांक २०/०६/२०१७ रोजीचा माहिती अर्ज होता. याबाबत नमूद करण्यात येते की, दिनांक १९/०४/२०१७ च्या आदेशानुसार गॅरेज विभाग प्रमुख म्हणून श्री.सचिन साहेबराव पाटील यांची नेमणूक करण्यात आली होती व त्यांना सहायक म्हणून मी कार्यरत होतो. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी नसल्याने माझा खुलासा मान्य करण्यात येऊन माझ्या विरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये, ही विनंती.

प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक, श्री. एकबाल अहमद जान मोहमद यांनी नमूद केले आहे की, दिनांक १९/०४/२०१७ च्या आदेशानुसार गॅरेज विभाग प्रमुख म्हणून श्री.सचिन साहेबराव पाटील यांची नेमणूक करण्यात आली होती व त्यांना सहायक म्हणून ते कार्यरत होते. प्रस्तुत प्रकरणी श्री. एकबाल अहमद जान मोहमद जन माहिती अधिकारी नसल्याने त्यांच्येविरुध्द शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

तसेच प्रस्तुत प्रकरणी श्री.सचिन साहेबराव पाटील हे जन माहिती अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २०/०६/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक, श्री. एकबाल अहमद जान मोहमद हे प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी नसल्याने त्यांचे विरुध्द प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक, श्री.सचिन साहेबराव पाटील यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २०/०६/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे

तात्काळ सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

(के. एल. बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-
10 AUG 2021

**प्रती,**

१. श्री. एकबाल अहमद जान मोहमद, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक.
२. श्री.सचिन साहेबराव पाटील, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गॅरेज इन्चार्ज, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक.

---

प्रत,
आयुक्त, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक.

यांना उपरोक्त आदेशानुसार माहितीस्तव आणि उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.